

# पार्वतीपरिणय

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. ५७६८



IRBK-0105768
IRBK-0105768

५७६८.

संस्कृत
साहित्य
सरिता
: ३१

वाणभट्ट-कृत

# पार्वतीपरिणय

कथासार
— म. ना. भावे

म. ग्रं. सं. ठाणे,
क्र. ५७६८
वि. ...

IRBK-0105768

IRBK-0105768



वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकर्तींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

# प रि च य

'कादम्बरी' या सुप्रसिद्ध संस्कृत गद्यग्रंथाचा कर्ता महाकवि बाणभट्ट यानें 'पार्वतीपरिणय' हें एकच नाटक लिहिलेलें आहे. या दोन ग्रंथांशिवाय 'हर्षचरित' व 'चण्डीशतक' हे त्याचे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. कनोजच्या श्रीहर्षवर्धनाच्या राजसभेंत गाजलेला हा महाकवी इ. सनाच्या सातव्या शतकांत होऊन गेला.

'पार्वतीपरिणया'चा कर्ता हा 'कादम्बरी' कर्त्या बाणभट्टापेक्षां वेगळा असल्याचें कांहीं पंडितांचें मत आहे.

तारकासुरानें सर्वांना 'त्राही भगवान्' करून सोडलें होतें. त्याचें पारिपत्य कसें करावें यासंबंधीं विचार चालू असतांना 'हें काम शंकर-पार्वतीचा पुत्रच करूं शकेल' असें ब्रह्मदेवांनीं सांगितलें. त्यामुळें पार्वती गौरीशिखरावर आपल्याला शंकरच पति मिळावा म्हणून जें घोर तप करीत होती त्याला फार महत्त्व आलें. आणि शंकर-पार्वतीचा विवाह घडवून आणण्यासाठीं इंद्रादिकांनींहि प्रयत्न सुरू केले. त्या शंकर-पार्वती-विवाहाची कथा या नाटकांत सांगितलेली आहे. याच कथानकावर कालिदासानें 'कुमारसम्भव' हें उत्कृष्ट काव्यहि लिहिलेलें आहे.

—लेखक

२०९७५

# पार्वतीपरिणय

त्रिभुवनांत संचार करणारे नारद एकदां आकाशमार्गानें हिमालयावर उतरत होते. त्यावेळीं त्यांचे मनांत विचार आला कीं दैवाची गति अतिशय विचित्र असते. नारदाच्या मनांत असा विचार यावयाचें कारण म्हणजे समोरच हिमालयावर तप करीत असणारी पार्वती त्यांना दिसली. पूर्वजन्मांत ही पार्वती दक्ष राजाची मुलगी दाक्षायणी होती आणि तिचा शंकराशीं विवाह झालेला होता. परंतु दक्ष राजानें यज्ञाचे वेळीं शंकरास न बोलाविल्यानें दाक्षायणीनें यज्ञांत उडी घेतली होती. तीच दाक्षायणी आतां गौरी म्हणून हिमालयाच्या पोटीं जन्माला आली होती. ती कठोर तप करीत होती तें शंकराशीं आपलें लग्न व्हावें या इच्छेनें.

या विचाराच्या तंद्रींतच नारद वायुमार्गानें हिमालयावर उतरले. मन्दार वृक्षांच्या रांगाच्या रांगा इतस्ततः पसरलेल्या दिसत होत्या. भृंगे गुंजारव करीत होते. सुगंधी वारे अंगाला सुखवीत होते. हिमालयावरून खालीं वहात जाणाऱ्या नद्यांचे प्रवाह पृथ्वीची शोभा अधिकच वाढवीत होते. हिमालयाची ही शोभा पाहात पाहात नारद

हिमवानाच्या ओषधिप्रस्थ नांवाच्या नगरींत येऊन पोहोंचले. गगनचुंबी सुवर्णशिखरें असलेल्या हिमवानाच्या वाड्यासमोर नारद येऊन उभे राहिले. आंत पाहातात तों हिमवान आपल्या पत्नीशीं-मेनेशीं कांहींतरी बोलत बसलेला त्यांना दिसला. नारद आलेले पाहातांच हिमवानानें उठून त्यांचें स्वागत केलें, त्यांना बसावयास आसन व अर्घ्य दिलें. नारदानें विचारलें, "काय, कसला विचार चालला होता ?"

हिमालय म्हणाला, "मुलीचा बाप असणें हें एक मोठेंच दुःख आहे. आमची गौरी आतां वयांत आलेली असल्यानें तिच्या विवाहाच्या काळजींत आहे मी. त्यासंबंधींच आम्ही आतां बोलत होतों."

"मग कोणता वर ठरविलास ? तुझ्या दोनहि मुली म्हणजे अप्रतिम लावण्य आहे. एक तर प्रत्यक्ष गंगा, देवनदी. तिच्या काळजींतून तर तूं सुटलास. तिला सागरासारखा पति मिळाला हें योग्यच झालें. पण पार्वतीसाठीं योग्य वर कोणता ?"

खरें म्हणजे याच प्रश्नामुळें हिमवानाला काळजी वाटत होती. पार्वतीसाठीं योग्य स्थळ कोणतें याविषयींची चिन्ता त्याला अस्वस्थ करीत होती. म्हणून हिमवानानें नारदाला विचारलें, "आपण सांगा ना एखादें योग्य स्थळ."

नारदानें विचार केला कीं पार्वतीसारखीला योग्य स्थळ सांपडणें कठीण आहे. नागलोक, मनुष्यलोक फार काय देवलोकांतहि तिच्यासाठीं योग्य वर नाहीं. पण भगवान शंकराचें नांव न सांगतांच नारदानें त्याला म्हटलें कीं, "बाबारे, मला अंतर्ज्ञानानें असें वाटतें आहे कीं हिला सामान्यांपेक्षां कोणीतरी श्रेष्ठ असा नवरा मिळेल. ही तुझी मुलगी म्हणजे कोणी सामान्य माणसाची मुलगी नाहीं. परमेश्वरी शक्तीच्या अंशामुळें ती जन्माला आलेली आहे. तेव्हां वाटेल त्याच्याशीं हिचें लग्न लावून देऊं नकोस."

हिमवान म्हणाला, "महाराज, असें कसें होईल ? मी आपल्या आज्ञेच्या बाहेर नाहीं."

मग नारदानें हिमवानाला सांगितलें, "हे पाहा, सर्व जगाला धारण करणारे व आठहि दिशा व्यापून राहाणारे अतिशय श्रेष्ठ असें भगवान शंकर या कैलासावर तप करीत आहेत. त्या परमेश्वराची आराधना केली पाहिजे. तेव्हां तूं आतां असें कर. पार्वतीला शंकराची सेवा करायला सांग. तिच्याबरोबर तिच्या मैत्रिणी असूं देत समिधा, कुश वगैरे पूजासाहित्य आणायला."

हिमवानाला यांतील मर्म कांहीं समजलें नाहीं. त्यानें फक्त 'बरें' म्हटलें.

नारदानें मनांत म्हटलें, 'चला, बीं तर टाकलें गेलें. आपलें काम झालें, आतां परत जायला कांहीं हरकत नाहीं.'

हिमवानाला आपण सांगितल्याप्रमाणें करायला पुन्हां बजावून नारद आल्या मार्गानें परत गेले. मग हिम-वानाच्या लक्षांत आलें कीं नारदाला जगांतला श्रेष्ठ असा भगवान शंकर हाच वर सुचवायचा असेल. मग मात्र त्याला नारदाच्या कौशल्याची जाणीव झाली. तो म्हणाला कीं, ' स्वतःच्या तेजानें दिवसादेखील तारकांचें दर्शन घडविणारा हा मुनि म्हणजे जणुं कांहीं दुसरा चंद्रच आहे. याचें सामर्थ्य खरोखरीच विलक्षण ! '

नंतर हिमवानानें मेनेला विचारलें, " ऐकलंस का ग तूं नारद काय म्हणाले तें ? "

" हो, जगांतला श्रेष्ठ असा पुरुषच पति मिळेल म्हणून ते म्हणाले ना, " मेनेनें उत्तर केलें.

' मग आपण आतां गौरीला नारदांनीं सुचविल्याप्रमाणें भगवान शंकराची सेवा करायला सांगायला हवें. ' हिमवानानें ठरवून टाकलें.

२ ...

वासन्तिका ही वनदेवता शंकरांच्या पूजेसाठीं फुलें आणण्याकरितां म्हणून नंदनवनाकडे निघाली. भगवान शंकर तपश्चर्येंत मग्न होते; म्हणून नंदीकेश्वरानेंच तिला

फुलें, पत्री आणण्याचें काम सांगून ठेविलेलें होतें. वासन्तिका त्यासाठीं आकाशमार्गानें जात होती. नंदनवन म्हणजे देवांची बाग. तेथें सुगंधाला काय तोटा! कल्पवृक्षांच्या फुलांनीं दशदिशांमध्यें सुगंध पसरविला होता. वासन्तिका जात असतांनाच समोरून रम्भा नांवाची अप्सरा येत असलेली दिसली. तारकासुर नांवाच्या राक्षसाच्या भीतीनें सर्व देव भयभीत झालेलें असल्यानें सर्व अप्सरा नगश्रेष्ठ मन्दारपर्वताच्या गुहांमध्यें लपून बसलेल्या होत्या. परंतु ही रम्भा निराळ्याच गर्दींत होती. कुबेराचा मुलगा नलकूबर याच्या भेटीची उत्कंठा तिला लागलेली होती. नलकूबरावर तिचें प्रेम असल्यानें 'त्याचेशिवाय मी क्षणभरहि जगणार नाहीं' अशा विचारतंद्रींतच ती चालली होती.

समोरून येणाऱ्या वासन्तिकेला पाहून तिनें विचारलें, "तुझ्या मैत्रिणीचें कसें काय चाललें आहे?" पण त्यावर उलट वासन्तिकेनेंच म्हटलें, "तूं इकडे कुठें निघालीस?" तेव्हां रम्भेनें तिला तारकासुराची हकीकत सांगितली व शेवटीं म्हटलें, "नलकूबराच्या भेटीशिवाय मला जगणें शक्य नाहीं म्हणून मी तिकडे निघाल्यें आहें." त्या दोघांची परस्परावरील प्रीति पूर्वींपासूनच सगळ्यांना माहीत झाली होती. त्यामुळें रम्भेचें हें वागणें स्वाभाविकच होतें.

"पण, तू कुठं चाललीस?" रम्भेनें वासंतिकेला विचारलें.

"मी जातें शंकरांसाठीं फुलें, पत्री आणायला."

"बरें, इतर कांहीं नवीन विशेष?"

रम्भेनें अशी चवकशी केली तेव्हां वासन्तिकेनें तिला गौरीविषयींची हकीकत सांगितली. गौरी हिमवानाच्या आज्ञेप्रमाणें आपल्या मैत्रिणीसह शंकरांची पूजा करीत असल्याचेंहि तिनें म्हटलें.

तारकासुराच्या त्रासानें सर्व देव घाबरून गेले असल्यानें इन्द्र मोठ्या काळजींत पडला होता. त्या काळजीनें तो खंगत चालला होता. तारकासुराचा नाश कसा करतां येईल याचा विचार करीत तो एकटाच बसला होता, तेवढ्यांत देवांचे गुरु बृहस्पति भेटीसाठीं आल्याची वर्दी देवनन्दीनें आणली. इन्द्रानें त्यांचें यथोचित स्वागत केलें. त्यांना बसावयाला आसन दिलें. बृहस्पति येऊन बसल्यानंतर देवनन्दी पुन्हां आंत आला व देवदूत देवलानें कांहीं बातमी आणल्याचें त्यानें सांगितलें. तेव्हां देवलाला आंत पाठविण्यास इन्द्रानें आज्ञा दिली. देवलानें येऊन म्हटलें, "महाराज, त्या तारकासुरानें मांडलेल्या कहराचें वर्णन आपणांसमोर कसें करावें अशा फिकीरींत मी पडलों आहें."

२०५७५ ७३३ २५।२।८

पण इन्द्रानें अनुमति दिल्यावर देवलानें तारकासुराच्या एकएक राक्षसी लीला वर्णन करून सांगावयास सुरुवात केली :

" तारकासुरानें ढगांना फेंकून दिलें. देवनगरींतील पाण्याचे प्रवाह त्यानें रोखून धरले, नंदनवनांतील अनेक वृक्ष समूळ उखडून फेंकले, तसेंच वाटेल ती वस्तु देवांजवळून हिसकावून घेण्याचा सपाटा त्यानें लाविला होता. फार काय, देवांगनांचे केंस ओढायला देखील त्यानें कमी केलें नाहीं. या सर्व अनर्थामुळें देव अगदीं त्रस्त झालेले दिसत आहेत. "

त्यावर इन्द्र प्रौढीनें देवलाला म्हणाला, " बरें, तूं जा आतां. अरे, माझ्यासारखा पराक्रमी वीर असतांना तुम्हांला काळजी करायचें कांहीं कारण नाहीं. वृत्रासुर, नमुचि इत्यादि राक्षसांना मी ठार केलें तिथें या तारकासुराचा काय पाड ? योग्य वेळीं मी त्याला मारीनच. "

पण देवल निघून गेल्यावर इन्द्र बृहस्पतीला म्हणाला, " महाराज, या तारकासुराच्या अनर्थाला आळा घालण्यासाठीं म्हणून आम्ही सर्व देवांची परिषद बोलावली होती. तेव्हां भगवान ब्रह्मदेवहि त्या सभेला हजर होते. आणि ते म्हणाले कीं, कोणातरी दुसऱ्या सेनापतीशिवाय तारकासुर

मारला जाणार नाहीं. तेव्हां आतां काय करायचें ? तारकासुराला मारण्याचा उपाय म्हणून त्यांनीं सांगितला आहे कीं ' हिमालयावर भगवान शंकर तपश्चर्या करीत आहेत, त्यांचें गौरीवर प्रेम निर्माण झालें म्हणजे त्या दोघांपासून उत्पन्न होणारा कुमार तुमची इष्टसिद्धी करील.' पण शंकर-गौरीचा विवाह होणार कसा व मग आमचे मनोरथ पूर्ण होणार केव्हां ? "

पण श्रेष्ठ लोकांचें बोलणें विफल कधींच होत नाहीं. गौरीनें हिमवानाच्या आज्ञेवरून शंकरांची पूजा करायला सुरुवात केली असल्याची बातमी रम्भेच्या तोंडून इन्द्राला कळलीच होती; ती त्याला आठवली.

बृहस्पति म्हणाले, " अरे, एवढें झालें मग आणखी काय पाहिजे! आपलें काम झालेंच म्हणून समज."

पण इन्द्राला शंका वाटत होती कीं, ' शंकर ही कांहीं सामान्य व्यक्ति नाहीं; अप्सरांचे विलास, कर्णमधुर गीतें, मनोहर बोलणें, मादक नयनबाण किंवा कंकणाचे मंजुळ आवाज इत्यादि गोष्टींचा देखील त्या तपस्व्यावर कोणताहि परिणाम होत नाहीं. मग बिचारी पार्वती काय करणार?'

पण पार्वती काय सामान्य स्त्री थोडीच होती! "शरीर-सौंदर्य व अंतःकरणांतील प्रेम यामुळें ती तर जणूं कांहीं

मदनाचें संमोहनास्त्रच आहे," बृहस्पति इन्द्राची शंका दूर करीत म्हणाले.

बृहस्पतीच्या या वाक्यानें इन्द्राला मदनाची आठवण झाली. गौरी व शंकर यांना एकत्र आणण्याचें काम मदनच करूं शकेल असें इन्द्राला वाटल्यानें त्यानें देवनन्दीला हांक मारली. त्याला त्यानें मदनाला बोलाविण्यास पाठविलें.

थोडया वेळानें मदन इन्द्राकडे आला. त्यानें आपल्या-बरोबर आपली पत्नी रति व मित्र वसंतऋतु यांनाहि आणलें होतें. त्याचें अत्यंत सुंदर असें पुष्पधनुष्य सर्व जगावर अधिकार गाजवीत होतें.

मदन आल्यावर इन्द्रानें त्या आपल्या मित्राचें स्वागत केलें. रति आणि वसन्तऋतुहि येऊन बसले. मदन आलेला पाहून बृहस्पति त्याला म्हणाले, "इन्द्र तुझा मान राखतो हें रास्तच आहे. या मानाला तूं योग्यहि व्हावेंस."

मदनानें विचारलें, "महाराज, आपणासारखे लोक असतांना माझ्यासारख्यानें कोणतें कार्य करावें? सूर्य असल्यानंतर दिव्याची जरूर काय?"

"तुझ्या या लोकविलक्षण धनुष्यानें तूं देवांचें एक काम करावयाला हवें आहे," बृहस्पतींनीं त्याला सुचविलें.

नतर इन्द्रानें मदनाला सांगितलें कीं, भगवान शंकर कैलासावर उग्र तपश्चर्या करीत बसलेले आहेत. आणि हिमवानानें दिलेल्या आज्ञेप्रमाणें त्याची मुलगी पार्वती आपल्या सर्व मैत्रिणींसह शंकरांकडे जाऊन त्याची आराधना करीत आहे. ती पार्वती अतिशय सौंदर्यसंपन्न आहे आणि भगवान शंकरानें आपल्याशीं लग्न करावें अशी तिची इच्छा आहे. या शंकर आणि पार्वतीच्या लग्नामुळें देवांचें एक मोठेंच कार्य घडून यावयाचें आहे. तेव्हां त्यासाठीं या दोघांचा विवाह लवकर घडून यावा म्हणून तूं खटपट कर.

मदनानें विचार केला कीं 'हें छान झालें! मी आपला मोठेपणा मिरवायला गेलों आणि हें नवें संकट गळ्यांत आलें. स्वतःच्या शक्तीची कल्पना नसली म्हणजे मरण ओढवायचें. प्रत्यक्ष शंकरांवर आपल्या अस्त्राचा प्रयोग करावयाचा म्हणजे दिव्यच आहे!'

वसंतऋतूला वाटलें कीं 'करायला गेलों एक आणि झालें भलतेंच. स्त्रियांना भुरळ पाडणारा हा मदन कुठें आणि केवळ डोळ्यांतील अग्नीनें जगाला जाळणारा तो शंकर कुठें!'

रतीलाहि वाटलें कीं शंकरांना जिंकणें कांहीं सोपें काम नाहीं.

मग मदन इन्द्राला म्हणाला, " जर सर्व देवांना माझ्या या कामानें उपयोग होत असेल तर प्राण गमावून देखील मी हें कार्य पूर्ण करीन. माझे प्राण मला प्रिय असले तरी मी या देवकार्यासाठीं अवश्य जाईन. कारण त्यामुळें या सेवकाला निष्कलंक अशा यशाची प्राप्ति होईल. तेव्हां आपल्या आज्ञेप्रमाणें मी काम करीन, ही खात्री बाळगा. "

असें म्हणून मदन आपल्या कामाला जावयास निघाला, तेव्हां देवराज इन्द्र व देवगुरु बृहस्पति यांनीं त्याला आशीर्वाद दिला.

बृहस्पतीच्या सल्ल्याप्रमाणें इन्द्रानें मदनाला पाठवून दिल्यावर बृहस्पति ईश्वरप्रार्थनेसाठीं निघून गेले व इन्द्रहि ' नियतीनेंच सर्व गोष्टी घडून येत आहेत तेव्हां आपल्या कार्यालाहि यश मिळेल ' असा विचार करीत प्रासादांतून बाहेर पडला.

२ ...

मदनाला कामगिरी सांगितल्यावर तो तर निघून गेला पण इकडे इन्द्राचा डावा डोळा लवूं लागला. त्यामुळें इन्द्राच्या मनांत काळजी निर्माण झाली. कारण मदनाला प्रत्यक्ष शंकराशीं सामना द्यावयाचा होता; आणि शंकराचा

क्रोध म्हणजे मदनाला मृत्युच यायचा. आपलें काम विघडतें कीं काय अशी शंका इन्द्राला भेडसावूं लागली.

बृहस्पति इन्द्राला धीर देत म्हणाले, "अरे सगळें शुभ होईल. थांब, आतां कोणीतरी बातमी आणील पाहा." आणि तेवढ्यांत महामुनि नारद येऊन थडकलेच. लगेच इन्द्रानें त्यांचें स्वागत केलें व त्यांना आसन दिलें. नंतर मोठ्या अधीरतेनें 'कांहीं बातमी आहे' का म्हणून त्यानें विचारलें. नारद तर मुद्दाम तिकडे जाऊन बातमी घेऊन आलेले असल्यानें त्यांनीं ती बातमी सांगायला सुरुवात केली. ते म्हणाले : मी मुद्दाम त्याच भागांत फिरत होतों. मदन हिमालयांत एका आश्रमाजवळ जाऊन पोहोंचल्यानंतर त्यानें वसंताला आपला प्रभाव दाखविण्यास सांगितलें. त्वरित हिमालयावर वसंतऋतु सुरू झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मन्द वारे वाहूं लागले. झाडांना नवे अंकूर फुटून तीं शोभिवंत दिसूं लागलीं. आंब्यांना बहर आला; वेली फोंफावल्या; चन्दनाचे वृक्ष व नद्यांचे शीतप्रवाह यांचेकडून येणारा वारा कमळांचे सुगंध बरोबर घेऊन वाहूं लागला.अशा रीतीनें सगळीकडचें वातावरण अतिशय प्रसन्न व आल्हाददायक झाल्यानंतर मदन आपलें पुष्पधनुष्य सज्ज करून हिमालय प्रदेशावर आला. त्याच्या धनुष्याच्या दोरीवर भृंगे गुंजारव करीत होते. त्यामुळें पक्ष्यांनीं प्रणयाराधनाला सुरुवात केली. आम्रवृक्षांना सुंदरींच्या

हस्तस्पर्शाशिवायच बहर आला; कामिनींच्या लत्ताप्रहारा-वांचूनच अशोक फुलूं लागले; त्यांच्या सुमधुर गीतांच्या अभावींदेखील प्रियालद्रुमांना टवटवी आली. थोडक्यांत म्हणजे प्रत्येक प्राणीमात्राच्या मनांत प्रणय उत्पन्न होईल असें मनोहर वातावरण निर्माण झालें. आणि मग स्वतः मदनदेखील पुढें आला.

त्यावेळीं भगवान शंकर आपल्या तपश्चर्येंत मग्न होते एका मोठ्या शिलाखंडावर वेदि तयार करवून त्यावर त्यांनीं समाधि लावली होती. चित्तवृत्ति अन्तर्मुख करून श्वास रोखून धरलेला होता. शांत मुखानें नाकाच्या शेंड्यावर दृष्टि स्थिर करून एखाद्या प्रशांत सागराप्रमाणें भगवान शंकर स्तब्ध बसले होते. पण शंकरांनीं पूर्वेकडे व मागें पश्चिमेकडे पाहिल्यावर त्यांचीहि समाधि भंगली. मग मात्र हातांत धनुष्य घेऊन उभा असलेल्या मदनाला भीति वाटली. काय करावें हें त्याला कळेना.

तेवढ्यांत वसन्तऋतूला साजेशी वेशभूषा केलेली. पार्वती आपल्या मैत्रिणींसह शंकराची पूजा करण्यासाठीं आली. त्यामुळें मदनाला थोडा धीर येऊन तो शंकराचे मागील बाजूस जाऊन योग्य क्षणाची वाट पाहात उभा राहिला. पार्वतीनें पुढें येऊन भगवान शंकरांची पूजा केली व शंकरांनींहि ' योग्य वर मिळो ' असा तिला आशीर्वाद

दिला. हीच वेळ योग्य आहे असें पाहून मदनानें आपल्या धनुष्याला संमोहनास्त्राचा बाण लावला.

त्यामुळें भगवान शंकरांची दृष्टि पार्वतीच्या हास्य-मुखाचें अवलोकन करूं लागली आणि पार्वती लाजेनें खालीं मान घालून उभी राहिली. तिच्या अंगावर रोमांच आले.

मग मात्र शंकरांनीं आपला विकार मनांतच दडपून त्याचें कारण शोधून काढण्यासाठीं इकडेतिकडे पाहिलें. समोर दिसला तो मदन. एक पाय पुढें टाकून त्यावर भार देऊन उभा असलेल्या त्या मदनानें आपल्या पुष्पधनुष्यावर मोहनास्त्राचा बाण लावलेला असून तो आपल्यावर नेम धरीत आहे ही गोष्ट चटकन भगवान शंकरांच्या लक्षांत आली. मग काय विचारतां ? शंकरांच्या तिसऱ्या डोळयांतून एक भयंकर अग्निज्वाला बाहेर पडली आणि तिनें तत्काळ मदनाला भस्मसात करून टाकलें.

ही बातमी ऐकतांच इन्द्राला मूर्च्छा आली.

सावध झाल्यावर "हे मित्रा, तूं माझ्यासाठीं आपल्या जीवाचीहि पर्वा केली नाहींस" असें म्हणून इन्द्र शोक करूं लागला. पण करणार काय ? नशीब बलवत्तर असतें !

नारद पुढें सांगूं लागले : मदन भस्मसात झाला आहे

हें पाहून रतीला घेरी आली, वसंत देखील मूर्च्छित पडला. मग ( चैत्र ) मधूनें त्यांना सावध केलें. पण रतीनें वाऱ्यानें उडून चाललेल्या मदनाच्या भस्मरूपी शरीराला आलिंगून मोठ्यानें शोक करण्यास सुरुवात केली. रडून रडून तिची छाती अश्रूंनीं भिजून गेली. तितक्यांत 'हे नाथ, हे नाथ,' म्हणून रडणाऱ्या रतीला आश्वासन देणारी आकाशवाणी ऐकूं आली ती अशी कीं–" हे मदनस्त्रिये, शोक आवर. जगांत ह्या कल्पनेच्या पलीकडे कोणीहि गेलेलें नाहीं. पार्वतीच्या विवाहानंतर भगवान शंकर मदनाला पुन्हां जिवंत करतील."

ही आकाशवाणी ऐकून इन्द्राला देखील धीर आला. वणव्यांत अर्धवट जळालेल्या वृक्षाला पर्जन्यधारा पडल्यावर जसा अंकुर फुटतो त्याप्रमाणें इन्द्राच्या मनांतहि नवीन आशा निर्माण झाली.

मग रतीचें कसेंतरी समाधान करून मधुमासानें तिला घरीं नेलें. आणि स्त्रीसहवास टाळण्यासाठीं भगवान शंकरहि आपल्या भूतगणांसह तेथून अदृश्य झाले. पण त्यामुळें पार्वतीला मात्र एकदम मूर्च्छा आली. नंतर हिमवान तेथें आला आणि गौरीला मोठ्या प्रेमानें घरीं घेऊन गेला.

ही हकीकत सांगून नारद ब्रह्मदेवाकडे ही बातमी देण्यासाठीं निघून गेले.

रम्भा कुबेर नगरींतून बाहेर पडली. आपणाला समजलेली बातमी राजाधिराज इन्द्राला सांगावी म्हणून ती इन्द्राकडे आली. इन्द्रानें विचारल्यावर ती म्हणाली कीं, भगवान शंकरानें मदनाला जाळून टाकल्याची बातमी सर्वत्र पसरली आहे.

तिनें आणखी असेंहि सांगितलें कीं "मदनाचा नाश झाल्यानें पार्वतीचा हिरमोड झाला आणि शंकर पति मिळावा म्हणून तिनें घोर तपश्चर्या आरंभिलेली आहे. मला मेनकेकडून असेंहि कळलें आहे कीं, पार्वती आचरण करीत असलेलें तप अतिशय कठीण आहे आणि ती स्वतः तर अगदीं कोमल, त्यामुळें तिची तपश्चर्या पूर्ण होणें फार कठीण दिसतें."

"बरें, हिमवानाला ही गोष्ट माहीत आहे का?" असें इन्द्रानें विचारतांच त्याच्या संमतीनेंच हें चालू असल्याचें रम्भा म्हणाली. त्यामुळें इन्द्र पुन्हां काळजींत पडला-पार्वतीच्या हातून हें तप सिद्धीला कसें जाणार?

४ ✦✦✦

भगवान शंकरांनीं नन्दीला बोलाविलें आणि त्याला सांगितलें कीं, "मीं मदनाचा नाश केल्यामुळें पार्वती निराश झालेली आहे. आणि मी पति मिळावा या इच्छेनें तिनें गौरीशिखरावर अतिशय कठोर नियमांनीं घोर तपश्चर्येस प्रारम्भ केलेला आहे. तपश्चर्या सुरू होऊन बराच कालावधि झालेला आहे. तेव्हां तूं जा आणि तिच्या मैत्रिणी जया आणि विजया यांना गांठून तिच्या तपश्चर्येची माहिती काढून आण. तिचे तपश्चर्येचे नियम कोणते आहेत, तिला तपश्चर्येनें काय मिळवावयाचें आहे वगैरे सगळी माहिती काढून आण."

देवनन्दी माहिती आणण्यासाठीं गौरीशिखरावर येऊन पाहातो तों पार्वती तप करतांना दिसली. तें पाहून त्याच्या मनांत विचार आला कीं, 'स्त्रियांचीं मनें किती कठोर असतात. ही अतिशय सुकुमार पार्वती आपल्या घोर तपश्चर्येनें मुनि लोक मिळवितात तसें पुण्य संपादन करते आहे.' जिला अत्यंत मऊ बिछान्यावर झोंपण्याची नेहमीं संवय ती आतां नुसत्या शिळांवर झोंपते आहे. जिनें नेहमीं तलम रेशमी वस्त्र नेसावयास पाहिजे ती आतां वल्कल परिधान करते आहे. घरांत बसून जिनें

डोळा लवत असून ती आपल्या मैत्रिणींशीं त्याविषयींच बोलत आहे.

जया तिला म्हणाली, "अग, बायकांचा डावा डोळा व पुरुषांचा उजवा डोळा लवणें शुभसूचक असतें. त्याअर्थी 'तुझ्या तपश्चर्येला लवकरच फळ येईल' असा वर देणारा कोणीतरी मुनि येथें येईल असें वाटतें."

या प्रसंगाचा फायदा घेऊन भगवान शंकर त्यांच्यासमोर उपस्थित झाले. तिच्या मैत्रिणींनीं यतिवेषधारी शंकरांचें स्वागत केलें. त्यांना पंख्यानें वारा घातला; त्यामुळें त्यांचे वाटचालीचे श्रम नाहींसे झाले. मग भगवान शंकरांनींहि त्या सत्काराचा स्वीकार करून 'ही कोण, तप कां करते' वगैरे पार्वतीविषयीं चौकशी केली.

जया म्हणाली, "महाराज, ही आमची प्रिय मैत्रीण पार्वती. ही हिमवानाची मुलगी असून अनुरूप पति मिळावा म्हणून तप करीत आहे."

तेव्हां शंकरांनीं विचारलें, "पण गिरिराज हिमवानासारखा पिता, सुंदर रूप, मधुर वाणी, उच्च स्थान या सर्व गोष्टी असतांना हिला कोणत्या महापुरुषाशीं लग्न करावयाचें आहे ! आणि त्या महापुरुषाचें हृदय हिच्याविषयीं इतकें कठोर कसें आहे ? त्याला तरी आपल्या भाग्याबद्दल इतकी बेफिकीरी कशी आहे ?"

जयेनें उत्तर दिलें, "ज्याची सर्व वेद नित्ययुवा व आद्यपुरुष म्हणून स्तुति करतात, जो ईश्वर म्हणून समजला जातो व ज्याच्या डोक्यावर चन्द्र विराजतो आहे असा भगवान शंकर हिला पति म्हणून हवा आहे."

जयेचें हें उत्तर ऐकून भगवान शंकरानें पार्वतीची परीक्षा घेण्यासाठीं स्वतःची टिंगल करावयाला सुरुवात केली. ते म्हणाले,

"काय तें शंकराचें स्वरूप! अंगभर भस्म फांसलेलें आहे; अंगावर दागिने कोणते तर म्हणे सर्प; राहतो स्मशानांत; त्याचे दास म्हणजे भूत आणि वेताळ. बरें, खाण्यासाठीं दररोज त्याला भिक्षा मागावी लागते. त्याची सगळी वागणूक जगावेगळी, अगदीं अशुभ! असें असतांनाहि पार्वति, तुला केवळ अज्ञानामुळें त्याच्याशीं लग्न करावयाची इच्छा झालेली दिसते. आम्ही आतां तुला काय सांगावें? आणि शिवाय असें पाहा, सर्व जगाला आनन्द देणाऱ्या चन्द्रकलेप्रमाणें असणारी तूं एका महान गिरिराजाची मुलगी कुठें आणि कुठें तो हत्तीचें कातडें पांघरून स्मशानांत राहाणारा अमंगळ शंकर!"

हें बोलणें ऐकून पार्वती संतापली. पण तरीहि शंकर पुढें म्हणाला, "पाहा बुवा, तूं त्या शंकराची इच्छा करणें म्हणजे चन्द्रकलेनें राहूची इच्छा करण्यासारखें आहे."

आतां मात्र पार्वतीचा संताप अनावर झाला. ती म्हणाली, " ज्या भगवान शंकराला सर्व लोक नमस्कार करतात त्यांची निन्दा करतांना तुमची जीभ झडून कां जात नाहीं ? मैत्रिणींनो, चला, अशा प्रकारचें मोठ्या लोकांची निन्दा ऐकण्याचें पाप करण्यापेक्षां आपण दुसरीकडे जाऊं या. "

असें म्हणून पार्वतीनें आपलीं वल्कलें सांवरलीं व ती तडक निघालीहि.

पण तेवढ्यांत भगवान शंकरांनीं आपलें खरें स्वरूप प्रकट केलें आणि पार्वतीचा हात आपल्या हातांत घेऊन म्हटलें, " तुझ्या तपश्चर्येमुळें मी तुझा दास झालों आहें."

या अनपेक्षित घटनेनें पार्वती आश्चर्यानें स्तब्ध उभी राहिली. किंचित् भय व किंचित् आश्चर्य यामुळें तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले व तिच्या कपाळावर घर्मबिंदु चमकूं लागले.

जया व विजया या तिच्या मैत्रिणींना देखील या प्रसंगामुळें एकदम हर्ष झाला.

भगवान शंकर म्हणाले, " गांधर्व पद्धतीनें मी तुझ्याशीं आतां विवाह करायला तयार आहें. "

त्यावेळीं जया म्हणाली, " महाराज, आपण आमची

एक प्रार्थना ऐकावी. नगाधिराज हिमवानानें तयार केलेल्या मोठ्या विवाहमंडपामध्यें पांच दिवसांच्या आंत योग्य मुहूर्त पाहून हा मंगल विवाह पूर्ण करतां येईल."

लोक-रीत मोडूं नये म्हणून शंकरांनीं ती सूचना मान्य केली.

पण शंकर मनांत म्हणाले, "पांच दिवस कशाला? आतां तर मला एका क्षणाचाहि विरह सहन होत नाहीं. मग पांच दिवस कसे काढायचे? निदान तीन चार दिवसांत तरी विवाह-समारंभ व्हावयाला हरकत नाहीं."

नंतर भगवान शंकर अन्तर्धान पावले व पार्वती सखींसह घराकडे परतली.

लग्नाची तयारी सुरू झाली.

५ ✤✤✤

पार्वतीच्या लग्नाची तयारी जोरांत सुरू झाली. हिमवानाच्या आज्ञेप्रमाणें ओषधिप्रस्थनगर सुशोभित करण्याचें काम जोरांत सुरू झालें. पताका, तोरणें, सडासंमार्जन यांनीं सगळी नगरी अगदीं उल्हसित वाटूं लागली. सप्तर्षींनीं विवाहमुहूर्त काढून दिला. मंगल कार्याच्या त्या दिवशीं वातावरणांतहि प्रसन्नता आलेली दिसूं लागली.

सर्वत्र फुलांचा सुगंध पसरला. मन्द शीतल वारा वाहूं लागला. वृक्ष–वेली बहरून आल्या.

हिमवान स्वत: पाहुणे मंडळीची व्यवस्था झाली आहे कीं नाहीं हें पाहात होता. नारदानें त्याला सांगितलेला श्रेष्ठ पुरुष पार्वतीला पति मिळाल्यानें सफलतेचा एक अमर्याद आनंद त्यांच्या ठिकाणीं दिसून येत होता. मेरु, मन्दार, विन्ध्य, गन्धमादन वगैरे मोठे गिरिराजदेखील लग्नाला उपस्थित झाले. कैलास मात्र वरपक्षाबरोबर पाठीमागून येणार असल्याचें कंचुकी शिलाधरानें सांगितलें. तसेंच आपापल्या पत्न्यांसह गन्धर्व, देव, अप्सरा वगैरे सर्व मंडळी पार्वतीच्या विवाह-समारंभासाठीं उपस्थित झाली होती.

नंतर हिमवानानें शिलाधरास पाठवून पार्वतीला मंडपांत आणण्याबद्दल सांगितलें. पार्वतीबरोबर वृद्ध कौशिकी व तिच्या इतर मैत्रिणीहि होत्या. अलंकार वगैरेचें काम हिमवानानें कौशिकीस सांगितलें व येणाऱ्या स्त्रिया व गिरिराज यांच्या स्वागताचें काम शिलाधरावर सोंपविण्यांत आलें.

नारदानें मंडपांत प्रवेश केला. आपण सुरू केलेल्या कार्याची सिद्धता पाहून ते हिमवानाला म्हणाले, " भाग्यवान आहेस बाबा, तूं. " हिमवान कृतज्ञतेनें उद्गारला,

२०९७५
आत वाङ्मय
०३३
नों. दि. २५।१२।
वाचनालय शाखा

" महाराज, आपण टाकलेल्या बीजाचेंच हें फळ आहे. " नंतर नारद मंडपांत जाऊन बसले.

'पार्वतीची सर्व तयारी झाली का' म्हणून हिमवानानें कौशिकीला विचारलें तेव्हां ती म्हणाली, " हो, पार्वतीच्या अंगाला सुगन्धी तेल लावलें व नंतर स्वर्गीय नद्यांच्या पवित्र पाण्यानें तिला स्नान घातलें आहे. तसेंच पायाला उत्तम असा लाक्षारस लाविलेला असून कमरेला माणकांचा कमरपट्टा घातला आहे. कानाला शोभिवंत असे कर्णालंकार घातल्यानें ती अधिकच सुंदर दिसत आहे. डोळ्यांत काजळ घातलें असून कपाळावर स्वतः मेनेनें चन्दनाचा लेप दिलेला आहे. तिच्या मैत्रिणींनीं तिची वेणी गुंफली असून तिची सर्व प्रकारची तयारी उत्तम प्रकारें झालेली आहे. "

अशा प्रकारें लग्नमंडपांत निरनिराळ्या गोष्टींची एकच गर्दी उडाली असतांनाच सर्व दिशा व गिरिगव्हरें भरून टाकणारा दुन्दुभींचा आवाज दुरून ऐकूं येऊं लागला. त्यामुळें सगळेजण तिकडे पाहूं लागले.

नारदानें हिमवानाला म्हटलें, " अरे, हा तुझा जांवई विवाहवेष करून इकडेच येत आहे, तेव्हां तूं त्याला अर्घ्य देण्याची तयारी कर. "

त्यानंतर वराच्या वेषांतील शंकरांची स्वारी लग्न-मंडपांत येऊन पोहोंचली. त्यांच्याबरोबर अनेक देव, देवता, चन्द्र, सूर्य, रुद्रगण वगैरे असंख्य लोक होते. शंकरांनीं लग्नमंडपांत प्रवेश केला. लग्नमंडप देवनगरी अमरावती-पेक्षांहि अधिक सुशोभित केलेला पाहून शंकरांना आश्चर्य वाटलें. तेव्हां शार्ङ्गी म्हणाला, " या पृथ्वीवरील महेन्द्राला तुम्ही कमी लेखतां कीं काय ?"

नंतर भगवान शंकरांना हिमवानानें अर्घ्य अर्पण केलें व शंकरांनींहि तें घेऊन हिमवानाला नमस्कार केला. मग ब्रह्मदेव इतर सर्व देवांना घेऊन विवाहवेदीजवळ आले. विवाह मुहूर्ताची वेळ जवळ आल्यानें बृहस्पति विवाह विधीची गर्दी करूं लागले. शंकरांना पाहून पार्वतीला अतिशय आनंद झाला. आणि 'आज माझे मनोरथ पूर्ण झाले' असें हळूच ती आपल्या प्रिय मैत्रिणीपाशीं म्हणाली.

ब्रह्मदेवानें सर्व देवांना आपापल्या जागीं बसावयास सांगितलें. हिमवानानें सर्व पर्वतराजांना आपापल्या जागीं बसण्याची विनंति केली.

पार्वतीला विवाहवेषांत पाहून भगवान शंकरांना ती शेंकडों मदनांप्रमाणें सुंदर भासूं लागली.

विवाहविधि सुरू झाले.

बृहस्पतींनीं शंकरांना पार्वतीचा हात हातांत घ्यावयास सांगितलें. त्या हस्तस्पर्शानें पार्वती रोमांचित झाली. तें पाहून शंकरांना पार्वती एखाद्या वसंतस्पर्शानें प्रफुल्लित झालेल्या आम्रवृक्षावरील वेलीप्रमाणें वाटली. नंतर दोघांनीं मिळून अग्नीला प्रदक्षिणा घातली.

त्यावेळीं पार्वतीनें शंकरांकडे पाहिलें व लाजेनें तिनें खालीं मान घातली. त्यावेळीं ती प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन चटकन परतणाऱ्या मासोळीसारखी दिसली.

त्यानंतर बृहस्पतीनें शंकराला पार्वतीचा पाय हातानें वेदीवर ठेवावयास सांगितलें. तेव्हां शंकर स्तब्ध उभे राहिले. सर्व कुलपर्वतांनीं " उपाध्याय सांगतात तसें करा " म्हणून शंकरांना म्हटलें; तर " जगाचें नियमन करणाऱ्या परमेश्वरावर तुम्ही कसें नियंत्रण ठेवतां ? " असा प्रश्न भूतगणांनीं विचारला. यावर ब्रह्मदेव म्हणाले, " सगळ्यांचें नियमन करणारा स्वतःचेंहि नियमन करूं शकतो. तेव्हां सांगितलें असेल तसें करा. "

मग शंकरांनीं पार्वतीचा पाय उचलून वेदीवर ठेवला. बृहस्पतींनीं बाकीचे विधि पूर्ण केल्यावर वधुवरांनीं ब्रह्मदेवाला नमस्कार केला; तेव्हां " तुमचें प्रेम चिरकाल टिको व तुमच्या मुलाकडून तारकासुराचा नाश होवो " असा आशीर्वाद त्यांनीं दिला.

तेवढ्यांत नारदानें उठून शंकरांची प्रार्थना केली कीं, " मदन पुनः जिवंत होवो. कारण त्यानें देवांच्या कार्यासाठींच आपला अपराध केलेला होता. "

' तथास्तु ' म्हणून शंकरांनीं म्हटलें. आणि रतिवसन्तासह मदनहि लग्नमंडपांत येऊन उभा राहिला.

अनुक्रम २०९७५
विभाग
क्रमांक ७३३
नों. दि. २५।१२।४५

म. ग्रं. सं. ठाणे वाचनालय शाखा
IRBK-0105768
IRBK-0105768